**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः 15.12.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्य मंत्रीमंडळाचा आज नागपूरमध्ये विस्तार,
- भारत लोकशाहीची जननी तर देशाचं संविधान एकतेचा आधार असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
- तारणमुक्त कृषी कर्जाच्या मर्यादेत रिझर्व्ह बँकेकडून चाळीस हजार रुपयांची वाढ,
- सृजनशील समाजनिर्मितीसाठी वाचन संस्कृती जिवंत ठेवणं काळाची गरज- पुणे पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन आणि,
- बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिकेच्या तिसऱ्या सामन्यावर पावसाचं सावट.

राज्यमंत्रीमंडळ-मुबईआरएनयू
राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आज संध्याकाळी नागपूर इथल्या राजभवनात होणार आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रीमंडळ विस्तार होत आहे. भाजप नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे मंत्र्यांची यादी पाठवली असून तिथून मंजुरी मिळाल्यानंतरच संबंधित आमदारांना सूचना देण्यात येणार आहे. नागपूरमध्ये 33 वर्षांनंतर मंत्रीमंडळ विस्तार होणार आहे.

**राज्यघटना अमृत महोत्सव**
देशानं राज्यघटना स्वीकार केल्यापासूनचा प्रवास असाधारण असल्याचं प्रतिपादन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत घटना स्वीकार केल्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित दोन दिवसीय चर्चेला उत्तर देताना केलं. आपल्या देशाची प्राचीन लोकशाही विश्वाला दीर्घकाळ प्रेरणा देत राहील. भारत केवळ मोठे लोकशाही राष्ट्र नसून ते लोकशाहीची जननी असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधानांनी काढले. २०४७ पर्यंत विकसित देशाच्या लक्ष्यपूर्तीत, एकता हे मूल्य महत्त्वाचं असून, आपलं संविधान एकतेचा आधार असल्याचंही ते यावेळी म्हणाले. संविधानाने महिलांना मतदान, आरक्षणासारखे अधिकार मिळवून दिल्याची आठवण त्यांनी करून दिली.
देशाच्या विविधतेचा भंग करणारे कृत्य केल्याबद्दल भूतकाळातल्या काँग्रेस सरकारवर टीका केली. नेहरू- गांधी घराण्याने संविधानावर वार केला, तसंच, भूतकाळातील सरकारचे निर्णय अधोरेखित करत प्रत्येक पातळीवर संविधानाला आव्हान दिल्याचंही ते म्हणाले. तर आम्ही गेल्या 10 वर्षात

संविधान बळकट केले. भाजपा सरकारने या देशातल्या सामान्य लोकांसाठी वन नेशन वन हेल्थ कार्ड, त्याचबरोबर वन नेशन वन रेशन, यासारख्या सामान्यांसाठी अनेक कल्याणकारी योजना आणल्या.
गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात राज्यघटनेची साठ वर्ष साजरी केल्याची आठवणही मोदींनी सभागृहाला सांगितली. राज्यघटना निर्मात्यांनी देशाची एकता, अखंडता राखण्यासाठी आरक्षणाला नकार दिला होता परंतु, काँग्रेसनं सत्तालालसेपोटी त्याचा भंग केला अशी टिका त्यांनी केली.
या चर्चेच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात करताना केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांनीही विरोधकांच्या अल्पसंख्याकांचे हक्क नाकारले जात असल्याच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उभं केलं.
लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावकरांच्या घटना भारतीय नसल्याच्या वक्तव्याचा हवाला देत, सत्ताधारी भाजपवर टीका केली. अण्णा द्रमुक पक्षाचे नेते ए. राजा, तेलुगू देसम पक्षाचे (टीडीपी) सदस्य लवू श्रीकृष्ण देवरायालू, भाजप खासदार तेजस्वी सूर्या, नॅशनल कॉन्फरन्सचे खासदार मियाँ अल्ताफ अहमद,  कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी लेनिनिस्ट) लिबरेशनचे खासदार राजा राम सिंह, काँग्रेसच्या कुमारी सेलजा, राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनीही समारोपाच्या दिवशी चर्चेत सहभाग घेतला. राज्यसभेत उद्या राज्यघटनेच्या गौरवशाली अमृतमहोत्सवी प्रवासावर चर्चा होणार आहे.

**कृषी कर्ज मर्यादा**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणमुक्त कृषी कर्जाच्या मर्यादेत चाळीस हजार रुपयांची वाढ केली आहे. नव्या वर्षापासून तारणमुक्त कृषी कर्जाची मर्यादा एक लाख साठ हजारांहून वाढून दोन लाख रुपये करण्याची घोषणा केली आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात, वाढती महागाई आणि शेती लागवडीचा वाढता खर्चाचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचं नमूद केलं आहे. शेतकऱ्यांना कृषी कामांसाठी तसंच कृषी विकासासाठी पुरेशी संसाधने उपलब्ध व्हावी यासाठी अतिरिक्त तारणाविना जास्त आर्थिक मदत पुरवण्याचा यामागे हेतू असल्याचंही निवेदनात म्हटलं आहे. या निर्णयामुळे पत सुलभता वाढणार असून त्याचा लाभ लहान शेतकऱ्यांना होणार आहे. यामुळे किसान क्रेडिट कार्डची उचल वाढेल जेणेकरून शेतकऱ्यांना शेतीशी निगडीत कामात गुंतवणूक करता येईल आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास हातभार लागणार आहे.

**कुष्ठ मुक्त महाराष्ट्र**

राज्यभरात उद्यापासून कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र म्हणजेच कुसुम ही विशेष मोहिम राबवली जाणार आहे. आरोग्य विभागाकडून होणाऱ्या नियमित तपासणीत गेल्यावर्षी वीस हजार नवे कुष्ठरूग्ण आढळून आले. केंद्राने २०२७ सालापर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचं उद्दीष्ट निश्चित केलं असून ते उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कुष्ठरुग्णांचा शोध घेतला जात आहे. कुसुम मोहिमेत वंचित गटांवर लक्ष केंद्रीत केलं जाणार असून, आशा स्वयंसेविका तसंच पुरूष स्वयंसेवकांच्या मदतीनं प्रत्यक्ष सर्वेक्षण

केलं जाणार आहे. यासाठी जिल्हा, तालुका आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर सूक्ष्म कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

**पुस्तक महोत्सव**

समाजाला सृजनशील आणि विचारवंत ठेवण्यासाठी वाचन संस्कृती जिवंत ठेवणं ही काळाची गरज असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुणे पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केलं. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं पुण्यातल्या फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.  यावेळी बोलताना, अशा प्रकारचा पुस्तक महोत्सव पुण्यापुरताच मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रात त्याचं आयोजन केले पाहिजे, याकरीता शासन आपल्या पाठीशी नेहमी उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. ग्रंथाविषयी आपल्या भावना उपस्थितांशी बोलतना व्यक्त केल्या ते म्हणाले....

पुस्तक प्रदर्शनानिमित्त लावण्यात आलेल्या विविध दालनांना फडणवीस यांनी भेट दिली आणि प्रकाशक, मुद्रक, विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पुणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या पुणे कार्यालयाच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन दिल्याबाबतचे पत्र दिले.
महोत्सवाच्या प्रवेशद्वारासमोर एक हजार पुस्तकांचा वापर करून सरस्वतीचं चिन्ह तयार करण्यात आलं आहे.

**दत्त जयंती**

राज्यात काल दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. गाणगापूर,कुरवपूर,औदुंबर,नृसिंह वाडी ,माहूर,गिरनार या आणि अशा अनेक दत्त क्षेत्रांच्या ठिकाणी दत्त जन्माचा सोहळा साजरा करण्यात आला. या ठिकाणी पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. राज्यातील दत्त मंदिरांमध्ये आकर्षक फुलांची सजावट आणि रोषणाई करण्यात आली होती. विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. कोल्हापूरमध्ये श्री क्षेत्र नृसिंहवाडी इथं दत्त मंदिरात सायंकाळी दत्त जन्मोत्सव सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील देवगड इथे महंत गुरुवर्य भास्कर गिरी महाराज यांच्या उपस्थितीत दत्तजन्म सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. रत्नागिरी जिल्ह्यातल्या लांजा तालुक्यातील आगवे गावात एक दिवस आधीच दत्त जयंती उत्सवाला सुरुवात झाली. रात्री होणाऱ्या भोवत्या हे कार्यक्रमाचं मुख्य आकर्षण होतं, त्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पुण्यातही काका हलवाई दत्त मंदिर तसंच

शहरातील अनेक दत्त मंदिरांमध्ये काल दत्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आठवडाभरापासून विविध धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आलं होतं. सांगली जिल्ह्यात पलूस तालुक्यातील औदुंबर इथं दत्त जयंती निमित्त महापूजा, महाप्रसाद तसंच दत्तगुरूंच्या जन्माचं वासुदेव जोशी यांचं कीर्तन झालं.

**वायूगळती**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या जयगड तालुक्यातल्या वायुगळती प्रकरणी जिंदाल कंपनीच्या दोन व्यवस्थापक आणि दोन अभियंते अशा चौघाजणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयगड पोलिस ठाण्यात त्यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.  नियमित देखभाल-दुरुस्तीचं काम करताना निष्काळजीपणा केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. दरम्यान, बाधित सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर आहे.

**अपघात**

जालना-सिंदखेडराजा मार्गावरील नाव्हा शिवरात काल दुपारी ट्रक आणि बसची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात 2 प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य दोघांना रुग्णालयात मृत्यू झाला. या अपघातात 24 प्रवासी जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त बस मालेगावहून माहुरगडकडे जात असताना ही दुर्घटना घडली.

**क्रिकेट**

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर -गावस्कर करंडक कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्याच्या पहिल्या दिवशी तेरा षटकांनंतर मुसळधार पावसानं हजेरी लावल्यानं खेळ थांबवावा लागला. तोपर्यंत ऑस्ट्रेलियाच्या नाबाद 28 धावा झाल्या होत्या. भारतीय कर्णधार रोहित शर्मानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ 1-1 असे बरोबरीत आहेत. ताज्या वृत्तानुसार ऑस्ट्रेलियाच्या  3 बाद 83 धावा  झाल्या आहेत.

**नाशिक थंडी**

नाशिकमध्ये गेल्या काही दिवसांपासून अतिथंडी, पाऊस त्यानंतर पुन्हा थंडीचा कडाका असे तापमानातील बदल नोंदवले जात आहेत. किमान तापमान काल 9 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सियस नोंदवले गेले. कडाक्याच्या थंडीचा रबी पिकांना फायदा होत आहे.

**हवामान**

नाशिकमध्ये गेल्या काही दिवसांपासून अतिथंडी, पाऊस त्यानंतर पुन्हा थंडीचा कडाका वाढला असून किमान तापमान काल 9 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सियस नोंदवले गेले. गेल्या 24 तासात राज्यात जळगाव इथं सर्वात कमी किमान तापमान 8 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस नोंदवले गेले.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**